follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

www.rajdand.com

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

२५ वर्षे विश्वासार्हतेची

✻ RNI Regd. No. 72105/99 | ✻ वर्ष २५, अंक १९३ | सातारा, गुरूवार, २१ मार्च, २०२४ | ✻ पाने ८ (सुप्रभात) | किंमत रू ५/-

# एकाचवेळी दोन पक्ष काँग्रेसमध्ये विलीन

## एक खासदाराचाही पक्षात प्रवेश, ऐन लोकसभा निवडणुकीत तीन राज्यात काँग्रेसला मोठं बळ!



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीपूर्वी जम्मूचे माजी भाजप नेते लाल सिंह आणि माजी खासदार पप्पू यादव यांनी आपापला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला आहे. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला तीन राज्यात बळ मिळालं आहे. काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांनी पप्पू यादव यांच्या पक्षाचे विलीनीकरण आणि लाल सिंह यांचा काँग्रेसमध्ये समावेश करण्याची मागणी केली होती. बसपमधून निलंबित करण्यात आलेल्या यूपीमधील अमरोहामधील खासदार दानिश अली यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

बिहारमध्ये लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसची ताकद वाढली आहे. माजी खासदार पप्पू यादव यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला. काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर पप्पू यादव म्हणाले की, आम्ही लालू यादव आणि तेजस्वी यादव यांच्यासोबत २०२४ च्या लोकसभा आणि २०२५ च्या विधानसभा निवडणुका जिंकू. लालू यादव यांचा माझ्याबद्दलचा पूर्ण स्नेह मुलासारखा आहे. त्यांच्या मनातून ना आपण बाहेर आलो ना त्यांनी कधी आपल्याला बाहेर काढले. आम्ही काल लालू यादव आणि तेजस्वी यादव यांचीही भेट घेतली. तेजस्वी यादव यांनी आपल्या १७ महिन्यांच्या कार्यकाळात आत्मविश्वास निर्माण केला आहे.

### डॉ. जितेंद्र सिंह यांच्या विरोधात उमेदवारी?

**उधमपूर लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार डॉ. जितेंद्र सिंह यांच्या विरोधात काँग्रेस चौधरी लाल सिंह यांना उमेदवारी देऊ शकते, असे सांगण्यात येत आहे. चौधरी लाल सिंह यांची कठुआ जिल्ह्यात चांगली राजकीय पकड आहे. हा उधमपूर लोकसभा मतदारसंघाचा भाग आहे. चौधरी लाल सिंह यांच्या काँग्रेसमध्ये विलीनीकरणानंतर पक्षाने सांगितले की, आज जम्मू-काश्मीर काँग्रेसचे प्रभारी भरत सोलंकी, काँग्रेस मीडिया विभागाचे अध्यक्ष पवन खेडा आणि जम्मू-काश्मीर पीसीसीचे अध्यक्ष विकार रसूल वाणी यांच्या उपस्थितीत चौधरी लाल सिंग यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. आणि त्यांचा पक्ष मडोगरा स्वाभिमान संघटना पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला. माजी खासदार पप्पू यादव यांनी आपला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन केला.**

### लाल सिंह उधमपूर मतदारसंघातून लोकसभेचे खासदार

**लोकसभा निवडणुकीपूर्वी जम्मूचे माजी भाजप नेते लाल सिंह यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. चौधरी लाल सिंह हे दोन वेळा उधमपूर मतदारसंघातून लोकसभेचे खासदार राहिले आहेत. चौधरी लाल सिंह यांनी २००४ आणि २००९ मध्ये उधमपूरमधून काँग्रेसच्या तिकिटावर विजय मिळवला होता. लाल सिंह २०१४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये सामील झाले आणि नंतर पीडीपी-भाजप सरकारमध्ये मंत्री म्हणून काम केले. मात्र, कठुआ बलात्कार प्रकरणाच्या वादामुळे लाल सिंह यांना मंत्रीपद सोडावे लागले होते. भाजपमधून बाहेर पडल्यानंतर लाल सिंह यांनी मडोगरा स्वाभिमान संघटनाफ हा स्वतःचा पक्ष स्थापन केला. काँग्रेसमध्ये विलीन झाल्यानंतर चौधरी लाल सिंह म्हणाले की, मला काँग्रेस परिवारात आणल्याबद्दल तुम्हा सर्वांचे मनापासून आभार.**

पप्पू यादव म्हणाले की, काँग्रेसच्या विचारसरणीचा त्यांच्यावर नेहमीच प्रभाव राहिला आहे. ते म्हणाले की, त्यांच्या पक्षाला संघर्षाचा इतिहास आहे. राहुल गांधींचे कौतुक करताना ते म्हणाले की, ते या जगातील सर्वात संघर्षशील व्यक्ती आहेत. ते म्हणाले, मला सर्वात जास्त आवडते ती व्यक्ती म्हणजे प्रियंका गांधी. मी त्यांचा खूप आदर करतो. या भारताचे मन कोणी जिंकले असेल तर ते राहुल गांधी आहेत. या लढ्यात मला नेहमीच भागीदार व्हायचे होते.

### दानिश अली यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला

**अमरोहा लोकसभा खासदार दानिश अली यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. दानिश अली यांना बहुजन समाज पक्षाने (बीएसपी) गेल्या वर्षी पक्षविरोधी कारवायांमध्ये सहभागी झाल्यामुळे निलंबित केले होते. काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर दानिश अली म्हणाले की, देशातील आजची परिस्थिती कोणापासून लपलेली नाही, एका बाजूला फुटीरतावादी शक्ती आहेत. तर दुसरीकडे देशातील गरीब, वंचित आणि पिडीत लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी धडपडणारे लोक आहेत. आज आपण एका चौरस्त्यावर उभे आहोत, निर्णय घेण्याची वेळ आली आहे. फूट पाडणाऱ्या शक्तींशी लढायचे आहे. पण काही अडथळे पार करायचे होते. त्यामुळेच मी हा निर्णय घेतला असून काँग्रेसशी हातमिळवणी केली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्याशी मी सतत बोलत होतो, असे ते म्हणाले.**

## सोलापूरमध्ये भाजपच्या इच्छुकांची भाऊगर्दी

**सोलापूर :** एकीकडे माढा लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना भाजपने पुन्हा दिलेल्या उमेदवारीवरून तिढा सुटला नसताना इकडे सोलापूर राखीव मतदारसंघात भाजपमध्ये इच्छुकांची भाऊगर्दी झाली आहे. संभाव्य उमेदवार म्हणून दररोज नवनवीन नावांची भर पडत आहे.

यातून उमेदवारी माळ नेमक्या कोणाच्या गळ्यात पडणार, याची उत्सुकता वरचेवर ताणली जात आहे. सोलापुरात मागील २८ वर्षांमध्ये भाजपचे पाच खासदार निवडून आल्याची पार्श्वभूमी आहे. लिंगराज वल्याळ (१९९६), प्रतापसिंह मोहिते-पाटील (२००३ पोटनिवडणूक), सुभाष देशमुख (२००४) यांच्यासह ड. शरद बनसोडे (२०१४) आणि डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजी (२०१९) यांनी खासदारकीची धुरा सांभाळली असताना त्यात अलिकडे सोलापूर महापालिका व जिल्हा परिषदेवरील सत्ताही भाजपच्या ताब्यात गेली होती. सध्या या लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभांपैकी पाच विधानसभा मतदारसंघांमध्ये भाजपचे आमदार कार्यरत आहेत.

अशा प्रकारे भाजपची घोडदौड सुरू असताना दुसरीकडे काँग्रेस व राष्ट्रवादीसह विरोधक विकलांग होत आहेत.

# रोहयोचा आराखडा १० हजार कोटींचा

## मजुरांच्या हाताला मिळणार काम, ५,२९१४२ कामे प्रस्तावित

**अमरावती :** जिल्हा परिषदेने सन २०२४-२५ या वर्षातील रोजगार हमी योजनेचा १० हजार १०५ कोटी ३५ लाख ७० हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. त्याला जिल्हा परिषद सीईओ तथा प्रशासक यांनी १५ मार्च रोजी मंजुरीही दिली आहे. या आराखड्यात ५ लाख २९ हजार १४२ कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यामुळे गावोगावच्या नागरिकांच्या हाताला काम मिळणार आहे.

ग्रामीण भागातील बेरोजगारांना गावातच हक्काचा रोजगार मिळावा, या उद्देशाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कामे करण्याची मुभा ग्रामपंचायतींना दिली. यासाठी ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात आहे. रोजगार हमी योजनेतून ग्रामीण शेतकरी, शेतमजुरांना सामाजिक सुरक्षा, महिला आणि दुर्बल घटकांचे सक्षमीकरण आणि पंचायतराज संस्थांना बळकट केले जात आहे.

जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या वार्षिक कृती आराखड्यात तालुक्यातील कामांचा समावेश केला आहे. अचलपूर ९९९९३, अमरावती २०५८७, अंजनगाव सुर्जी १७१३७, भातकुली ५४६००, चांदूर रेल्वे ३४९३, चांदूर बाजार १८९७०, चिखलदरा १०६८३२, दर्यापूर १२०७२, धामणगाव रेल्वे ४१७३, धारणी ५६१८७, मोर्शी २९१४३, नांदगाव खंडेश्वर ४१३६४, तिवसा २०३८१, वरूड ४४२१० अशी एकूण ५ लाख २९ हजार १४२ वैयक्तिक व सार्वजनिक कामांची संख्या आहे.

या आराखड्यात काँक्रीट रस्ता, ग्रामपंचायत विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, ग्रामपंचायत भवन, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, नाला खोलीकरण, पाणंद रस्ता, पेव्हर ब्लॉक बसविणे, फळबाग लागवड, बंदिस्त गटार, रस्ता काँक्रिटीकरण, वृक्षलागवड, नाडेफ खत, सार्वजनिक शेततळे, सार्वजनिक शोषखड्डा, सिमेंट बंधाऱ्यातील गाळ काढणे, ओढा खोलीकरण, तलाव गाळ काढणे, दगडी बांध, माती नालाबांध, सीसीटी, अंगणवाडी इमारत, रोपवाटिका, शालेय स्वयंपाक घर, शाळा अंगणवाडी किचन शेड, शाळा परिसर बंदिस्त गटार, शाळा परिसरात शोषखड्डा, संरक्षण भिंत, गांडूळ खत युनिट, कुक्कुटपालन शेड, बांबू लागवड, सिंचन विहीर अशी कामे केली जाणार आहेत.



# शिर्डीतून सेनेच्या वाकचौरे यांनाच उमेदवारी

## विनायक राऊतांनी महाआघाडीच्या पदाधिकाऱ्यांसमोर दिले संकेत

**अहमदनगर :** शिवसेना ठाकरे गटाचे खासदार विनायक राऊत यांनी शिर्डीतून भाऊसाहेब वाकचौरे यांची उमेदवारी निश्चित असल्याचे स्पष्ट केले. वाकचौरे हे महाआघाडीचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवतील व विजयी होतील असे ते म्हणाले.शिर्डीतील उमेदवारीचा सस्पेन्स त्यामुळे उठला आहे. वाकचौरे यांच्या उमेदवारीची मुंबईतून केवळ औपचारिक घोषणा त्यामुळे होणे बाकी आहे.

शिर्डीत शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत गुरुवारी विनायक राऊत यांनी ही माहिती दिली. यावेळी भाऊसाहेब वाकचौरे, शिवसेना जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे सचिन बडदे, लखन भगत, संजय छल्लारे, राष्ट्रवादीचे संदीप वर्पे उपस्थित होते. महाआघाडीच्या उमेदवारी वाटपात शिर्डीच्या जागेबाबत अनेक दिवस घोळसुरू होता. शिर्डीची जागा काँग्रेसला सोडून त्या बदल्यात शहरी मतदारसंघ सेनेला देण्याची चर्चा सुरू होती. मात्र खासदार राऊत यांनी ही चर्चा थांबवली आहे. ते शिवसेनेचे सचिव असून वरिष्ठ नेते आहेत. त्यांनी महाआघाडीच्या पदाधिकाऱ्यांसमोर वाकचौरे यांची उमेदवारी जाहीर केल्याने इतर सर्व चर्चा आता संपुष्टात आल्या आहेत.राऊत म्हणाले, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना लोक विजय करतील. वाकचौरे हे लोकसंपर्क असणारे उमेदवार आहेत. त्यांनी श्रद्धा व सबुरी जपली आहे.

फोडाफोडीचे राजकारण लोकांना नको आहे. शिवसेनेत पंतप्रधानपदासाठी कोणीही दावेदार नाही. महाआघाडीचे नेते व राष्ट्रवादीचे पक्षप्रमुख शरद पवार तसेच काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी हे पंतप्रधान पदाचे इंडिया आघाडीकडून दावेदार आहेत. इंडिया आघाडीची सत्ता आल्यास सेनेला मंत्रिपद मिळतील. त्याचा आम्हाला निश्चित अभिमान राहील.

# आचारसंहितेच्या कचाट्यात जिल्ह्यातील ६३ कोटींच्या विकासकामांना लागला ब्रेक



**अकोला :** अकोला लोकसभा मतदारांघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसह अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी लागू करण्यात आलेल्या आचारसंहितेच्या कालावधीत कार्यारंभ आदेश (वर्क ऑर्डर) बाकी असलेली विकासकामे सुरू करता येणार नाहीत. या पार्श्वभूमीवर आचारसंहितेच्या कचाट्यात जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत विविध यंत्रणांच्या जिल्ह्यातील ६३ कोटी रुपये किमतीच्या नवीन विकासकामांना ङ्गब्रेकफ लागला आहे.

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनांतर्गत २०२३-२४ या आर्थिक वर्षात जिल्ह्यात विविध योजना आणि विकासकामांसाठी २५० कोटी रुपयांचा निधी मंजूर असून, त्यापैकी १३ मार्चपर्यंत १८७ कोटी रुपयांचा निधी विकासकामांवर खर्च करण्यात आला असून, उर्वरित ६३ कोटी रुपयांचा निधी खर्च होणे बाकी असतानाच, अकोला लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसोबतच अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी १६ मार्चपासूनआचारसंहितालागू करण्यात आली. अखर्चित निधीतील ङ्गवर्क ऑर्डरफ देण्याची प्रक्रिया बाकी असलेली विकासकामे आचारसंहितेच्या कालावधीत सुरू करता येणार नाहीत. त्या अनुषंगाने आचारसंहितेच्या अंमलबजावणीत विविध यंत्रणांची जिल्ह्यातील प्रस्तावित नवीन विकासकामेआचारसंहितासंपुष्टात येईपर्यंत थांबविण्यात आली आहेत.

### आचारसंहिता संपल्यानंतरमार्गी लागणार कामे!

**अकोला लोकसभा मतदारसंघाच्या सार्वत्रिक निवडणुकीसह अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी २६ एप्रिल रोजी मतदान घेण्यात येणार असून, ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येणार आहे. त्यानुसार, आचारसंहितेत ङ्गब्रेकफलागलेली जिल्ह्यातील विकासकामे आचारसंहिता संपल्यानंतर मार्गी लागणार आहेत.**

### या कामांसाठी मंजूर २५० कोटी यंत्रणांना वितरित!

**जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेत जिल्ह्यातील विविध विकासकामांसाठी मंजूर २५० कोटी रुपयांचा निधी १५ मार्चपर्यंत संबंधित यंत्रणांना वितरित करण्यात आला आहे. त्यामध्ये महानगरपालिकासह जिल्ह्यातील नगरपालिका, जिल्हा परिषद, आरोग्यसेवा, महावितरण, क्रीडा विभाग, पोलिस विभाग आदी यंत्रणांचा समावेश आहे.**

### आहे निधी!

जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेंतर्गत जिल्ह्यात रस्ते, नाल्या, जलसंधारण, शिक्षण, आरोग्यसेवा, वीजपुरवठा, पशुसंवर्धन, क्रीडा आदी विविध विकासकामांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे.

## स्थित्यंतर

राही भिडे

९८६७५२१०४९

निवडणूक रोख्यांची संकल्पना मांडताना तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी निवडणुकीतील काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रिया स्वच्छ करण्यासाठी हे रोखे आणले आहेत, असे सांगितले होते; परंतु आता मएडीआरफ सारख्या संस्था तसेच अन्य स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या जनहित याचिकेवर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाला ज्या शंका आल्या, त्या सामान्यांना फार पूर्वीपासून येत होत्या. स्टेट बँक स्वायत्त असली, तरी तिच्यावरचा सरकारी दबाव लपून राहिलेला नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांचा तपशील द्यायला सुरुवातीला टाळाटाळ केली आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या दट्ट्यानंतर माहिती दिली, तरी परस्परांशी न जुळणारी होती. कोणते रोखे कुणी घेतले, किती पैशाचेघेतले,तेकोणत्या राजकीयपक्षासाठी होते, याचा तपशील काही स्टेट बँकेने दिला नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँकेची चांगलीच खरडपट्टी काढली आणि माहिती देण्यासाठी ठराविक मुदत दिली. ही माहिती बाहेर आली असती, तर अन्य राजकीय पक्षांपेक्षाही भारतीय जनता पक्षासाठी ते जास्त अडचणीचे ठरले असते. त्याचे कारण साठ अब्ज रुपये एकट्या भाजपला या निवडणूक रोख्यातून मिळाले आहेत. निवडणूक आयोग हा स्वायत्त असला, तरी निवडणूक रोख्यांचा गोरखधंदा! सर्वोच्च न्यायालयाच्या दोन आदेशानंतर लोकांना किमान निवडणूक रोख्यांत काही काळेबेरे असल्याचे समजले आहे. माहिती अधिकारात माहिती दडवण्याचा प्रयत्न, नंतर अर्धवट माहिती देणे असे प्रकार घडले. लोकसभा निवडणुकीच्या काळात खरेतर भाजप अडचणीत आला असता; परंतु निवडणूक आयोग स्टेट बँकेच्या मदतीला आला आहे. त्याच्या निवडीत सरकारची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे निवडणूक आयुक्त सरकारधार्जिणी भूमिका घेत असतात. नव्याने नियुक्त झालेले दोन आयुक्त हे भाजपचे चांगलेच मित्र आहेत, असे सांगितले जाते. त्यांच्या नियुक्तीनंतर आता स्टेट बँकेला दिलासा मिळाला आहे. त्याचे कारण सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांची विस्तृत माहिती देण्याचा आदेश देताच निवडणूक आयोगाने तातडीची बैठक घेऊन निवडणूक आणि आचारसंहिता जाहीर केली. त्यामुळे आचारसंहितेचे कारण पुढे करून ही माहिती आता जाहीर करता येणार नाही, अशी भूमिका घेतली जाऊ शकते. त्यातच निवडणूक आयोगाच्या उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या संख्येचे कारण पुढे केले जाऊ शकते. त्यामुळे निवडणूक संपल्यानंतरच ही माहिती जाहीर होण्याची शक्यता असून, विरोधकांना भाजपचा भांडाफोड करता येणार नाही, अशी व्यवस्थाच जणू करून ठेवली आहे.

# निवडणूक रोख्यांचा गोरखधंदा

**सर्वोच्च न्यायालयाच्या दोन आदेशानंतर लोकांना किमान निवडणूक रोख्यांत काही काळेबेरे असल्याचे समजले आहे. माहिती अधिकारात माहिती दडवण्याचा प्रयत्न, नंतर अर्धवट माहिती देणे असे प्रकार घडले. लोकसभा निवडणुकीच्या काळात खरेतर भाजप अडचणीत आला असता; परंतु निवडणूक आयोग स्टेट बँकेच्या मदतीला आला आहे.**



निवडणूक रोखे आणि कंपन्यांवर पडलेल्या छाप्यांचा काही संबंध नाही, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले असले, तरी तपास यंत्रणांचे पडलेले छापे आणि त्यानंतर संबंधित कंपन्यांचे निवडणूक रोख्यातील व्यवहार तसेच निवडणूक रोख्यात गुंतवणूक आणि नंतर संबंधित कंपन्यांना मिळालेली कामे याची कालसुसंगता पाहिली, तर संशय घ्यायला जागा राहते. सरकारने २०१६-२०१७ च्या वित्त कायद्याद्वारे निवडणूक रोखे योजना आणली. त्यामुळे कोणालाही त्यांच्या आवडत्या राजकीय पक्षांना अज्ञातपणे देणग्या देण्याची परवानगी दिली. निवडणूक रोख्यातील देणगी प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या अभावामुळे मोठ्या कॉर्पोरेशन्सना परवाने, सरकारी करार, भाडेपट्टे आणि अगदी अनुकूल परिणाम मिळविण्यासाठी देणग्या देणे सोपे झाले, असे तज्ज्ञांना वाटत होते. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने ही भीती खरी ठरली आहे. निवडणूक रोख्यांकडे पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणूक पद्धतींचा मोठा विजय म्हणून अनेकांनी पाहिले; परंतु वस्तुस्थिती वेगळीच होती, हेआतापुढे आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाच्या पॅनेलने १५ फेब्रुवारी रोजी केंद्राची निवडणूक रोखे योजना रद्द केली. त्यानंतर, स्टेट बँकेला निवडणूक रोखे खरेदी करणाऱ्या देणगीदारांचे सर्व तपशील, खरेदी केलेली रक्कम आदी तपशील उघड करण्याचे आदेश देण्यात आले. निवडणूक रोख्यांचा पहिल्या वर्षापासून एक वर्षाचा डेटा गहाळ आहे. प्रत्येक कॉर्पोरेशनने कोणत्या पक्षाला किती देणगी दिली हे अद्याप गुलदस्त्यात आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी स्टेट बँकेची चांगलीच कानउघाडणी केली. भारतीय जनता पक्षाला २०२३ आर्थिक वर्षात सुमारे १,३०० कोटी रुपये मिळाले. एकूण निवडणूक रोख्यात ही रक्कम पन्नास टक्क्यांहून अधिक होती, तर त्याचवर्षी काँग्रेसला मिळालेल्या रकमेच्या सातपट अधिक होती. २०१९ ते २०२४ दरम्यान खरेदी केलेल्या एकूण १२ हजार १५५ कोटी रुपयांच्या निवडणूक रोख्यांपैकी भाजपने ६०६१ कोटी रुपये, ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसला १६१० कोटी रुपये मिळवले. सत्ताधारी पक्षाला निवडणूक रोख्यांत एवढा मोठा हिस्सा मिळाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

ठलॉटरी किंगफ सँटोगो मार्टिन यांच्या कंपन्यांनी १, ३६८ कोटी रुपयांची देणगी दिली. त्यांचा भाजपशी संबंध आहे. गेल्या दहा वर्षांपासून त्यांची कंपनी तपास यंत्रणांच्या रडारवर आहे. राजकीय पक्षपातातील आपला सहभाग लपवण्यासाठी शेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून पैसेही दान केले असावेत. मोठ्या प्रमाणात योगदान देणाऱ्या अनेक देणगीदार कंपन्या मनिष्क्रियफ असल्याचे आढळून आले आणि त्यामुळे देणगीदारांचे खरे तपशील अजिबात पारदर्शक नव्हते. दोन कोटी रुपये कमावणारी कंपनी १८५ रुपयांचे रोखे खरेदी करते, हा साराच व्यवहार संशयास्पद आहे. अहवालानुसार, यामध्ये रुंगटा सन्स, एसएन मोहंती, सासमल इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, एक्सिट्रेडिंग फायनान्स आदी कंपन्यांचीही तीच गत आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँकेला झटका दिल्यानंतर निवडणूक रोख्यांमधील गोरखधंदा जनतेसमोर आला आहे. या गोरखधंद्यात भाजपने सर्वाधिक उखळ पांढरे केले आहे. यामध्ये ठईडीफ, ठसीबीआय च्या धाडी आल्यानंतर एका दणक्यात निवडणूक रोखे खरेदी केल्याचे समोर आले आहे. २०१९ आणि २०२४ मधील राजकीय पक्षांना सर्वाधिक बाँड देणाऱ्यांपैकी तीन कंपन्या आहेत, ज्यांनी मईडीफ, मआयटीफ चौकशीला सामोरे जात असतानाही निवडणूक रोखे खरेदी केले आहेत. यामध्ये लॉटरी कंपनी फ्यूचर गेमिंग, इन्फ्रास्ट्रक्चर फर्म मेघा इंजिनिअरिंग आणि खाण क्षेत्रातील दिग्गज वेदांता यांचा समावेश आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अनेक पक्षातील कार्यकर्त्यांचा प्रवेश



**राजदंड न्यूज नेटवर्क**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अनेक पक्षातील कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. सकाळपासून पवार यांच्या मोदी बाग येथील कार्यालयात अनेक जणांचे प्रवेश करण्यात आले.

मनसेचे माजी नगरसेवक राहुल तूपेरे, माजी खासदार गिरश बापट यांचे स्विय सहाय्यक सुनील माने, माजी नगरसेवक आरिफ बागवान, हावेलीचे माजी पंचायत समिती सदस्य सुनील खेडेकर यांच्यासह काही कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्यात आला. दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज या कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश झाला आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार या कार्यकर्त्यांनी केला आहे. पवार यांनी गेल्या काही दिवसांपासून बेरजेचे राजकारण सुरू केले आहे. महाविकास आघाडी म्हणून लोकसभा निवडणूक लढणार आहे. पुणे, शिरूर, बारामती आणि मावळ मतदारसंघाचा शरद पवार यांनी आढावा घेतला आहे. या चारही मतदारसंघात उमेदवार विजयी होण्यासाठी पवार यांनी प्रयत्न सुरू केले आहेत. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली असली तरी अद्यापही बारामती वगळता इतर मतदारसंघातून उमेदवार घोषित करण्यात आले नाही.

## शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा : डॉ अरविंद माने यांची मागणी

**शिरोळ** : शिरोळ शहर व उपनगरातील मोकाट कुत्र्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा या मागणीचे निवेदन भारतीय जनता युवा मोर्चा कोल्हापूर जिल्हा ग्रामीण पूर्वचे अध्यक्ष व शिरोळचे माजी नगरसेवक डॉ अरविंद अशोकराव माने यांनी शिरोळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक निशिकांत प्रचंडराव यांना दिले आहे .



शिरोळ शहर व उपनगरामधील मोकाट भटक्या कुत्र्यांच्या त्रास सर्वच नागरिकांना सहन करावा लागत असून अनेकांचा जीव धोक्यात आला आहे विशेषता शिरोळ शहरामधील रोहीदास नगर, यादव नगर, घालवाड रस्ता, संगम नगर, राम नगर, व इतर उपनगर परिसरामध्ये मोकाट भटक्या कुत्र्यांचा उच्छांद वाढला आहे. अनेक गावामध्ये झालेल्या भटक्या कुत्र्यांनी अनेकांचा(चावा) घेतला आहे हे पहाता शिरोळ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण आले असून शिरोळ नगरपरिषद हद्दीतील असणार गल्ली बोळ , मटण मार्केट, फास्ट फूड याठिकाणी रस्त्यावर अचानक दिसणाऱ्या कुत्र्यांच्या झुंडी पाहुन नागरिक भयभीत झाले आहेत. अशा मोकाट भटक्या कुत्र्यांचे प्रमाण वाढले असून त्यांचा त्वरित बंदोबस्त केला पाहिजे.

कोल्हापूर येथे महानगरपालिका परिसराच्या ३०० मीटर अंतरावरील २१ वर्षाची कु श्रुष्टी शिंदे या मुलीचा कुत्र्यांच्या चाव्याने जिव गमवावा लागला आहे. असा अनुचित प्रकार शिरोळमध्ये घडू नये यासाठी आपली खबरदारी म्हणून भटक्या कुत्र्यांचा वेळेवर बंदोबस्त करून उपाययोजना करण्याकरिता आपल्याकडील आरोग्य विभाग अँटी रेबीज लस उपलब्ध व्हावी व डॉगव्हॅनच्या माध्यमाद्वारे परिसरामधील असणाऱ्या अशा कुत्र्यांचा ताबडतोब बंदोबस्त करावा अशी मागणी माजी नगरसेवक डॉ अरविंद माने यांनी निवेदनाद्वारे केली आहे . यावेळी माजी नगरसेवक दादासो कोळी सामाजिक कार्यकर्ते बबन बन्ने उपस्थित होते .

## सातारा शहरात वाह,, क्या, हॉटेल दावत..

**सातारा** : सातारा शहराची ओळख ही जशी कंदपेढ्याने झाली आहे. त्याच धर्तीवर आता हॉटेल दावत म्हणजे नाम ही काफी है! अशा पद्धतीने आता सातारा शहरात या हॉटेलने अल्पावधीमध्ये चवीने लोकप्रियता निर्माण केलेली आहे.



साताऱ्यात चवीचे खाणार त्यांना निश्चितच हॉटेल दावत मध्ये समाधान मिळणार असं त्यांच्या घोषवाक्य बनले आहे.

सातारा राष्ट्रीय काँग्रेस कमिटी पासून पोलीस मुख्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरच सातारा चिकन सेंटरच्या शेजारी हे हॉटेल दावत आहे .चायनीज शाही, बिर्याणी हाऊस आणि तंदूर हाऊस म्हणून उभे राहिलेले आहे. या ठिकाणी सोरमा ,चिकन टिक्का, चिकन रोल, चिकन समोसा, बैदा रोटी, ड्रम स्टिक असं चविष्ट व ताज्या चिकन व मटन पासून तयार करण्यात आलेले हे पदार्थ म्हणजे जिभेवर चव आणि पौष्टिक जेवणाने भूक भागवली जाणार आहे. याची खरी खुरी गॅरंटी आहे. खटाव तालुक्यातील वडूज या ठिकाणी शाहरुख नासीर खान डांगे व त्यांची मॉसाब व नातेवाईक, मुल व दाजी शहाबाज पठाण यांनी पाच सहा वर्षांपूर्वी वडूज नगरीमध्ये दावत हॉटेल उभारणी केली. अनेक नामांकित व सर्वसामान्यांनी या हॉटेलच्या व येथील शाकाहारी- मांसाहारी जेवण व बिर्याणी व इतर खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतलेला आहे. त्यामुळे आता सातारा शहर परिसरातील खवय्यांसाठी साताऱ्यात नवीन दालन उभारले आहे.

## शिरोळ प्रारूप आराखडा पृथ्वीराज यादव यांच्याकडून दिशाभूल व राजकारण : अंकुशचा आरोप

**शिरोळ** : शिरोळ शहराच्या प्रारूप आराखड्यातील खाजगी जमिनीवरील आरक्षणे जवळपास ९०% रद्द व अनेक ठिकाणचे चुकीच्या पद्धतीचे रस्ते रद्द करून इतर ठिकाणी आरक्षण टाकणाऱ्यास आम्ही सुरुवातीपासून प्रयत्न केल्याने ते यशस्वी झाले आहे. मात्र, पृथ्वीराज यादव हे शहरवासीयांना चुकीची माहिती पसरवून दिशाभूल करत या प्रारूप आराखडा संदर्भात राजकारण करत आहेत असा घणाघाती आरोप आंदोलन अंकुशचे प्रमुख धनाजी चुडमुंगे यांनी पत्रकार परिषदेत केला.



**शिरोळ प्रारूप विकास आराखडा बाबत माहिती देताना आंदोलन अंकुश चे प्रमुख धनाजी चुरमुंगे**

ते पुढे बोलताना म्हणाले, शिरोळ शहराचा विकास आराखडा हा पुढील २० वर्षाच्या लोकसंख्येला ज्या पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागणार आहेत, त्याचा विचार करून बनवला गेला आहे. पण डिसेंबर २०२२ मध्ये को विकास आराखडा तयार केला होता, तो पूर्णपणे खाजगी जमिनीवर आरक्षण टाकून बनवला गेला होता. तो रद्द करून नव्याने सरकारी जागा, गायरान, नगरपरिषद मालकीच्या खुल्या जागा आणि सार्वजनिक वापराच्या खुल्या जागांवर आरक्षण टाकून तयार करावा म्हणून सुरुवातीपासून याला विरोध केला होता. फक्त विरोध करून न थांबता पुढे वर्षभर पाठपुरावा करून जवळपास सगळ्या खाजगी जागांवरील आरक्षणे काढून ती सरकारी, गायरान, नगरपरिषद मालकीच्या व सार्वजनिक वापराच्या जागांवर आरक्षणे टाकायला लावून खाजगी जमिनी वाचवण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. असे असताना, काही लोक राजकीय हेतूने अशा विकास आराखड्यास रद्द करा, विकास आराखडा पाहिजे कशाला...? दर दोन वर्षांनी पाच टप्प्यात विकासा आराखडा तयार केला जाणार. जमिनी काढून घेतल्या जाणार. १७ कत्तलखाने, १५ ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प होणार २० ठिकाणी दफनभूमी १८ ठिकाणी मटण शॉप असल्याचा खोट्या बतावण्या मारून शिरोळकरांच्या मनात भीतीचे वातावरण तयार करण्याचा किळसवाना प्रकार करीत आहेत. पांढरे कपडे घालून मोठे - मोठे फ्लेक्स लावले म्हणजे पुढारी होत नाही. तर पुढाऱ्यांना सामान्यांच्या प्रश्नांची जाण असावी लागते व ते सोडवण्यासाठी त्यांनी प्रयत्न करावयाचे असते असा टोलाही त्यांनी पृथ्वीराज यादव यांना लगावला. इथून पुढे कोणाच्याही खाजगी जागा काढून घेतल्या जाणार नाहीत याबाबत निश्चित राहावे. प्रस्थापित राजकारण्यांना हे चांगलं झालेलं काम पचनी पडेना झालंय म्हणून त्याला नावं ठेवण्याचं काम सुरू असून, गावातील नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता नगरपरिषदमध्ये जाऊन नकाशे पाहून आरक्षणाबाबत खात्री करून घ्यावी, असे आवाहनही आंदोलन अंकुशने यावेळी केले आहे. या पत्रकार परिषदेला आंदोलन अंकुशचे जिल्हाध्यक्ष राकेश जगदाळे, एकनाथ माने आदी उपस्थित होते.

## बारामती - शिरूर लोकसभा निवडणूक अजित पवारांना वाटते तेवढी सोपी नाही

**राजदंड न्यूज नेटवर्क**

एकीकडे घरातल्या लोकांशी लढाई, दुसरीकडे शिवतारे आणि हर्षवर्धन पाटील, अशा चक्रव्यूहात उपमुख्यमंत्री अजित पवार अडकले आहेत. अजित पवार यांनी यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे त्यांच्यासोबत पत्नी आणि दोन मुले वगळता कुटुंबातील कोणीही नाही, याचा प्रत्यय येवू लागला आहे. त्यांचे सख्खे बंधू उद्योजक श्रीनिवास, भावजय शर्मिला आणि पुतण्या युगेंद्र यांनी त्यांची साथ सोडली आहे.



विजय शिवतारे यांनी अजित पवार यांच्या समोर आव्हान उभे केले आहे. आपण बारामती लोकसभा निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांनी केलेल्या टीकेची आठवण शिवतारे वारंवार करून देत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवतारे यांना युतीधर्म पाळावे लागणार, असल्याचे सांगितले. मात्र, शिवतारे यांची अद्यापही नाराजी कायम आहे.

दुसरीकडे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी अद्यापही आपली भूमिका जाहीर केली नाही. २०१९ च्या विधानसभा निवडणुकितील पराभव त्यांच्या जिव्हारी लागला आहे. नेमके पाटील कोणाला सहकार्य करणार, याची उत्सुकता लागली आहे.

सुप्रिया सुळे विरोधात सुनेत्रा पवार असा सामना रंगणार आहे. त्या पार्श्वभूमीवर भोरचे माजी मंत्री अनंतराव थोपटे आणि आमदार संग्राम थोपटे यांच्या कुटुंबातील सदस्यांची सुनेत्रा पवार यांनी भेट घेतली. त्यानंतर लगेचच माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनीही थोपटे यांची घरी जाऊन तब्बेतीची विचारपूस केली. त्यामुळे यावेळी पवार यांनाही वाटते निवडणूक सोपी नाही.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# खासदार उदयनराजे भोसले पक्षश्रेष्ठींशी चर्चा करण्यासाठी दिल्लीला रवाना

## साताऱ्याच्या उमेदवारीचा तिढा सुटण्याची चिन्हे



**सातारा :** सातारा लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवारीचा गुंता सुटायला तयार नाही तो गुंता सोडवण्यासाठी आणि उमेदवारीच्या संदर्भात निर्णायक चर्चा करण्यासाठी खासदार उदयनराजे भोसले दिल्लीला रवाना झाल्याची माहिती आहे .रात्री उशिरापर्यंत राजे समर्थकांचे फोन अचानक आऊट ऑफ कव्हरेज लागू लागल्याने राजांच्या दिल्लीवारीच्या शक्यतेला पुष्टी मिळत आहे . या चर्चेमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे सुद्धा सहभागी होणार असल्याच्या चर्चेने या बैठकीला महत्त्व आले आहे.

खासदार उदयनराजे भोसले यांनी यंदा लोकसभेत पुढच्या दाराने सभागृहात पोहोचण्याचा चंग बांधला आहे .त्यासाठी तिकीट मिळणार की नाही या चर्चा सुरू असताना राजेंनी मात्र तयारीला प्रत्यक्षरीत्या सुरुवात केली आहे . तरीही लोकसभा निवडणुकांच्या तिकिटाची चर्चा निर्णायक टप्प्याकडे निघालेली आहे हे पाहून उदयनराजे यांनी देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी चर्चा केली होती त्यावेळी त्यांना राज्यात स्टार प्रचारकासह केंद्रातही मोठी जबाबदारी दिली जाणार असल्याच्या बातम्या येऊ लागल्या . त्यामुळे नक्की सातारा लोकसभेचे चित्र काय असणार याविषयी राजकीय धुरीणांना सुद्धा अंदाज बांधणे कठीण झाले होते . बुधवारी सायंकाळी उदयनराजे भोसले सातारा लोकसभेच्या उमेदवारीचा गुंता सोडवण्यासाठी दिल्लीला रवाना झाले ते दिल्लीमध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असल्याची चर्चा आहे . महायुती मधील उपमुख्यमंत्री अजित दादा पवार गटाने राष्ट्रवादीचा बालेकिल्ला म्हणून सातारा लोकसभेच्या जागेवर दावा सांगितला आहे ही जागा अजितदादा गटाला गेल्यास उदयनराजे यांची अडचण होऊ शकते मात्र तत्पूर्वी राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी राष्ट्रवादी कडून उदयनराजे यांनी लढावे अशी ऑफर दिली होती मात्र या गोष्टीला उदयनराजे यांनी नकार दिल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले जर पक्षश्रेष्ठींच्या दिल्ली येथील चर्चेमध्ये समन्वयक तोडगा निघाला तर उदयनराजे राष्ट्रवादीच्या तिकिटावर लढणार का या प्रश्नाचे उत्तर मिळू शकते असा आशावाद आहे .

उदयनराजे अजूनही साताऱ्याची जागा भाजपला मिळावी आणि त्यातही तिकीट आपल्याला मिळावे यासाठी आग्रही आहेत देवेंद्रजी फडणवीस यांनी महाराष्ट्राची आयपीएल टीम आपलीच आहे आपणच कॅप्टन आहात असे विशेष अधिकार उदयनराजे यांना दिले होते त्यामुळे उदयनराजे सांगतील त्या पद्धतीने राजकीय समीकरणे असतील असाच संदेश गेला होता.

त्यामुळे उदयनराजे या सर्व प्रश्नांची उत्तरे पक्षश्रेष्ठींकडून घेण्यासाठी दिल्लीला रवाना झाले आहेत या दौऱ्या संदर्भात उदयनराजे समर्थकांकडून कोणतीही माहिती देण्यात आली नाही मात्र समाज माध्यमांवर राजे साताऱ्याच्या लोकसभा तिकिटासाठी तातडीने दिलेल्या रवाना झाल्याचे वृत्त फिरू लागल्यानंतर राजकीय समीक्षकांच्या भुवया उंचावल्या आहेत जर उदयनराजे भोसले यांनी राष्ट्रवादीच्या तिकिटावर लढण्यास नकार दिला तर अजित दादा कडून सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष नितीन काका पाटील यांना संधी दिली जाऊ शकते.

# संजय गांधी निराधार समिती सदस्यपदी मिनाक्षी मोरे यांची निवड



**सातारा :** जिजामाता महीला विकास मंडळाच्या सातारा जिल्हा उपाध्यक्षा सौ. मिनाक्षी निलेश मोरे यांची सातारा तालुका संजय गांधी निराधार समिती सदस्य पदी निवड झाली आहे. महसुलचे उपजिल्हाधिकारी विक्रांत चव्हाण यांनी नुकतेच त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले आहे.

शिवसेना शहरप्रमुख निलेश मोरे यांच्या त्या पत्नी आहेत. निलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मीनाक्षी मोरे यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष मार्फत महिलांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित केली असून त्याच्या माध्यमातून अनेक गरजूंना लाभ मिळवून दिला आहे. कोव्हिड काळात जिजामाता महीला मंडळ माध्यमातून शंभर बेडचे जिजामाता कोव्हिड सेंटर सुरू केले होते. शहरासह उपनगरातील अनेकांना या माध्यमातून उपचार मिळाले. महिलांसाठी वेगवेगळी शिबिरे, हळदीकुंकू कार्यक्रम, निराधार महीलांना शासकिय योजनांचा लाभ मिळवून देणे असे विधायक कार्य सुरू आहे. त्यांच्या निवडीबद्दल मुख्यमंत्री ना एकनाथ शिंदे, त्यांच्या पत्नी सौ. लता एकनाथ शिंदे, खा.श्रीकांत शिंदे, पालकमंत्री शंभूराजे देसाई, आ. महेश शिंदे, डॉ.सौ.प्रियाताई शिंदे, डॉ.अरुणा ताई बर्गे,महिला जिल्हा प्रमुख शारदा जाधव यांनी अभिनंदन केले आहे.



# सातारा शहरातील १५० वीज ग्राहकांची बत्ती गुल

### महावितरणची कारवाई; तब्बल ७ कोटींची थकबाकी

**सातारा :** महावितरणच्याभरारी पथकाने शहरातील थकबाकीदारांवरील कारवाई तीव्र केली असून, आज, मंगळवारी१५० ग्राहकांचावीजपुरवठाखंडित करण्यात आला. या कारवाईनंतर खडबडून जागे झालेल्या काहीवीजग्राहकांची थकबाकी भरून वीजपुरवठा पूर्ववत करण्याची धावाधाव दिवसभर सुरू होती.

आर्थिक वर्ष संपण्यासाठी अवघे अकरा दिवस उरले असून,महावितरणला१ लाख ९ हजार घरगुती ग्राहकांकडून थकबाकीपोटी तब्बल ७ कोटी ५९ लाख १५ हजार रुपये वसूल करावयाचे आहेत. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी महावितरणने वसुली मोहिमेला गती दिली असून, वारंवार कल्पना देऊनही वीजबिल न भरणाऱ्या थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केला जात आहे. यासाठी महावितरणने सातारा शहरातील पाच विभागांसाठी सात भरारी पथकांची नेमणूक केली आहे.

पथकांकडून आजदिवसभरात माची पेठ, फुटका तलाव, केसरकर पेठ, शनिवार पेठ, गुरुवार पेठ तसेच सोमवार पेठेतील एकूण १५० घरगुती थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला.

या कारवाईनंतर काही ग्राहकांनी तातडीने थकबाकी भरून वीजजोडणी पूर्ववत केली. दि. १ ते १९ मार्च या कालावधीत महावितरणने शहरातील तब्बल ८०० थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. ग्राहकांनी चालू वीजबिल व थकबाकी वेळेत भरून कटू कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

# सातारा पालिकेने २६५ जणांना बजावली दंडात्मक कारवाईची नोटीस

**सातारा :** सातारा पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने शहरातील २६५ बोगस नळ कनेक्शनचा पर्दाफाश केला आहे. या नळनधारकांना पालिका प्रशासनाने दंडात्मक ... बोगस नळ कनेक्शनचा पर्दाफाश, सातारा पालिकेने २६५ जणांना बजावली दंडात्मक कारवाईची नोटीससातारा : सातारा पालिकेच्यापाणीपुरवठाविभागाने शहरातील २६५ बोगस नळ कनेक्शनचा पर्दाफाश केला आहे. या नळनधारकांना पालिका प्रशासनाने दंडात्मक कारवाईची नोटीस बजावली असून, दंड भरून नळकनेक्शन नियमित न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला आहे.



दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की, सातारावासीयांनापाणीटंचाईबरोबरचपाणीकपातीचा सामना करावा लागतो. त्यामुळे पालिका प्रशासनाला नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. दैनंदिन पाणीपुरवठ्यात कोणताही बदल न करता नागरिकांकडून पाणीपुरवठ्याच्या तक्रारीत वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे ङ्गपाणी नेमकं मुरतंय कुठंफ याचा पाणीपुरवठा विभागाच्या पथकाकडून शोध घेण्यात आला.

या मोहिमेत शहरातील नळकनेक्शनची तपासणी करण्यात आली. या तपासणीत डोंगरी भाग तसेच काही पेठांमध्ये तब्बल २६५ बोगस नळकनेक्शन आढळून आले. पालिकेने अशा नळधारकांची यादी तयार केली असून, संबंधितांना दंडाची नोटीसही बजावली आहे. दंड व निर्धारित शुल्क भरून नळकनेक्शन नियमित करण्याचे आदेश देण्यात आले असून, असे न केल्यास संबंधित नळधारकांना कठोर कारवाईस सामोरे जावे लागेल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

# राज्यातील डाळिंबाच्या बागा अडचणीत?

**पुणे :** पाणी टंचाईमुळे राज्यातील डाळिंबाचा अंबिया बहर अडचणीत आला आहे. दरवर्षी अंबिया बहरात सरासरी ५० हजार हेक्टरवर फळे घेतली जातात. पाण्याअभावी यंदाच्या अंबिया बहरात जेमतेम २५ हजार हेक्टरवर फळे घेतली जाणार आहेत. उन्हाळाभर पाणी मिळण्याची शाश्वती नसल्यामुळे शेतकरी डाळिंबाचे पीक घेणे टाळत आहेत.

अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे म्हणाले, राज्यभरात डाळिंबाचे क्षेत्र २.६५ लाख हेक्टरवर आहे. मृग, हस्त आणि अंबिया बहारात डाळिंबाचे उत्पादन घेतले जाते. सध्या बाजारात हस्त बहरातील डाळिंबाची खरेदी- विक्री सुरू असून, हस्त बहार अंतिम टप्प्यात आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या (फळ धारणा) साधारण पंधरा डिसेंबरपासून मार्चच्या मध्यापर्यंत होतात. फळांची काढणी जूनपासून ऑगस्टपर्यंत होते.

अंबिया बहरात प्रामुख्याने पुणे, नगर आणि सोलापूर जिल्ह्यांत फळे घेतली जातात. दरवर्षी साधारण ५० हजार हेक्टर फळे घेतली जातात. पण, यंदा पाण्याची मोठी टंचाई जाणवत असल्यामुळे जेमतेम २५ हजार हेक्टरवरच फळ छाटणी घेणे शक्य झाले आहे. अंबिया बहरातील फळ छाटण्या पूर्ण झाल्या आहेत. फळ छाटण्या झालेल्या बागांमध्ये फूल धारणा आणि फळ धारणा सुरू आहे. वाढते तापमान आणि पाणी कमी पडत असल्यामुळे फळ धारणा कमी होऊ लागली आहे. पाणी टंचाई आणि वाढत्या तापमानामुळे फळांचा आकार लहान राहण्याचा अंदाज आहे. सोलापूर परिसरात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसवर गेले आहे. तापमान वाढ अशीच होत राहिल्यास इंदापूर, सांगोला आणि सोलापूर परिसरातील डाळिंब पिकाला मोठा फटका बसण्याची भीती आहे. सांगोला येथील डाळिंब उत्पादक शेतकरी दत्तात्रय येलपले म्हणाले, पुणे, नगर जिल्ह्याच्या तुलनेत सांगोला आणि सोलापूर परिसरात अंबिया बहरात कमी क्षेत्रावर फळे घेतली जातात. सांगोला तालुक्यात सिंचनाची सोय नसलेल्या भागात पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. हा हंगाम उन्हाळाभर असतो. तापमान जास्त असल्यामुळे या काळात पाण्याची गरजही जास्त भासते. यंदा डाळिंबाना उन्हाळाभर पाणी पुरेल, अशी स्थिती नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अंबिया बहारात फळे घेणे टाळून जूनमध्ये मृग बहरात फळे घेण्याचे नियोजन केले आहे.

अंबिया बहरात पाणी कमी पडण्याच्या शक्यतेमुळे शेतकऱ्यांनी फळ छाटण्या (फळधारणा) घेणे टाळले आहे. मृग बहारात फळधारणा क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. पाण्याची टंचाई असल्यामुळे फळधारणा कमी होण्याची आणि फळांचा आकार लहान राहण्याचा अंदाज आहे, अशी माहिती अखिल भारतीय डाळिंब उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे यांनी दिली आहे.



# गुंड लल्लन जाधवच्या साता-यात राडा

सातारा शहरालगतच्या प्रतापसिंह या उपनगरामध्ये गुंड लल्लन जाधव आणि त्याच्या टोळक्याने नगर परिसरात तलवार नाचवत सुमारे वीस ते तीस वाहनांची तोडफोड केली जुन्या भांडणाच्या कारणावरून एका कुटुंबातील अल्पवयीन मुलीवर तलवारीने वार करून त्या कुटुंबीयांना धमकावल्याचा प्रकार समोर आला आहे..या प्रकरणांमध्ये एकूण बारा जणांवर गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून याप्रकरणी सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सातारा शहर पोलिसांनी या घटनेच्या पार्श्वभूमीवर कोंबिंग ऑपरेशन करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आहे याप्रकरणी प्रताप श्रीनगर येथील अल्पवयीन मुलीची फिर्याद नोंदवली गेली आहे लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता सुरू असताना लल्लन आणि त्याच्या फळकुट टोळीने उच्छाद घातल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या आदेशाने सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के आणि त्यांच्या पथकाने परिसरात चोख बंदोबस्त ठेवला आहे अजय उर्फ लल्लन जाधव सागर खोडे राजू उर्फ बंटी लोमटे सुनील वाघमारे विजय उर्फ बबल्या जाधव दत्ता उर्फ गजऱ्या आसावरी ऋतिक उकिरडे विकास रमेश खुडे ओंकार देढे सुनील दत्ता जाधव मधुरमा दत्ता जाधव अम्मी बोराटे मच्छिंद्र उर्फ टाकल्या बोराटे जय कांबळे किरण उकिरडे यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात कोणाची नोंद करण्यात आली.

# २१ मार्च-जागतिक वन दिनानिमित्ताने जंगलाचे काही पैलू




दृष्टीआड सृष्ट असे आपण नेहमीच ऐकत असतो. पण या सृष्टीच्या आड असे काय आहे? जे आपल्याला दृश्य नाही, दिसत नाही अश्या कितीतरी गोष्टी या सृष्टीची चक्रे फिरवत असतात. यामध्ये दगड, माती, हवा, पाणी असे निर्जीव घटक आहेत त्याचप्रमाणे झाडे-किडे, माणूस-प्राणी, साप-मासे असे विविध सजीवही आहेत. या सर्वांच्या अनुकूल-प्रतिकूल सहबंधाने शतकानुशतके पृथ्वीचा इतिहास लिहीला जात आहे. या सर्व सजीव-निर्जीव गोष्टींचा प्रभाव एकमेकांवर पडत असतो; त्याचप्रमाणे यांच्या पूरक वापराने एकूणच जीवसृष्टीचे संवर्धनही होत असते.

माणूस हा निसर्गाचा वैरी नसून त्याच्याच मदतीने निसर्गाचे जतन व संवर्धन होऊ शकते. जंगलांतून मिळणाऱ्या संसाधनांचा मानवाच्या उपजीविकेशी थेट संबंध आहे. २००२ साली जंगल संवर्धनासाठी जैवविविधता कायदा मंजूर झाला. सामुहिक वनहक्क कायदा आला. आदिवासींचे व इतर परंपरेने राहणाऱ्या आणि जंगलांचे संवर्धन करणाऱ्या वननिवासी यांचे जंगलावरील हक्क याला मंजूरी देण्यात आली. आणि याच कायद्यांचा व इतर शासकीय योजनांचा आधार घेत गावांमध्ये बदल घडू लागले. यातले काही उदाहरणे सांगता येतील. धुळे जिल्ह्यातील बारीपाडा हे गाव. काही वर्षांपूर्वी गावात वनव्यवस्थापन समिती स्थापन झाली. आणि उजाड झालेल्या जंगलाचे संवर्धन झाले. जंगलात चराईबंदी कुऱ्हाडबंदी करण्याचे लोकांनीच ठरविले. जंगलांतील सर्व झाडांची मोजणी झाली मोह या उत्पन्न मिळवून देणाऱ्या झाडांचा लिलाव होऊ लागला, जो गावातील लोकच घेऊ लागले. त्यातून जमा झालेल्या रकमेतून गावात विकासकामे झाली. जंगल वाढले. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढली. उत्तम शेती होऊ लागली. गाव समृद्ध बनले.

दुसरे उदाहरण धुळे जिल्ह्यातीलच लामकानी गावाचे. शहरात राहणाऱ्या डॉक्टर धनंजय नेवाडकर ह्यांना झालेल्या अपघातामुळे ते काही महिने सक्तीची विश्रांती घेण्यासाठी गावी आले. त्यावेळी लोकांपुढे चार आणि विहिरीचे पाणी आटण्या मोठी समस्या आहे असे त्यांच्या लक्षात आले. गावाच्या बाजूलाच सातपुड्याच पर्वतरांग आहे. साधारण एक हजार एकरांचा हा डोंगर सुजलाम, सुफलाम करण्याचे त्यांनी ठरविले. त्यासाठी रोजगार हमी योजनेचा आधार घेतला. पाणी अडवा, पाणी जिरवा ही कामे तेथे सुरु केली. गावातील लोकांना रोजगार हमी योजनेचा फायदा मिळाला, रोजगार मिळाला. त्यातून गावातील पाण्याची समस्या मिटली आणि डोंगर पुन्हा समृद्ध बनला.

आदिवासी भागात सामुहिक वनहक्क मिळालेल्या गडचिरोली जिल्ह्यातील १०२५ गावांनी जैवविविधता समित्या स्थापन करून मोठ्या प्रमाणात जंगलसंवर्धनाला सुरवात केली आहे. यातूनच लोकांच्या उपजीविकेचा प्रश्नही सुटला आहे. २००५ ला आलेल्या या कायद्यानुसार जंगलांतील बांबू, तेंदूपत्ता या सर्वांचे मालकी हक्क ग्रामसभेला मिळाले. बांबूसारख्या वनोपजाची व्यवस्था लोकांनी केली. यातून बांबूकटाई साठीची मजुरी आधीपेक्षा तिप्पट प्रमाणात लोकांना मिळाली शिवाय या बांबूविक्रीतून गावासाठी आवश्यक विकासकामांसाठी लोकांना पैसे मिळाले. कोरची तालुक्यात तर सालेम, झेंडेपार, अरवीटोला, अंधेरी, टेंभली, काळेगाव या गावातील लोकांनी सात एकर नवीन बांबूची लागवड केली आहे. जे जंगल त्यांना जगवते त्या जंगलाला ते जगवत आहे, वाढवत आहे.

जसे वनांवरील हक्क लोकांना मिळत आहे तसेच जंगल संवर्धन आणि जतन करण्याची जबाबदारीही लोकांकडे आहे. ज्या भागांत वनव्यवस्थापन समिती नाही किंवा नुसतीच कागदोपत्री आहे अशा काही गावांतून लोकांना पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे, पण, बेजबाबदारपणामुळे त्यावर नियंत्रण नाही. यातून जंगलांचा नाशच जास्त होत आहे व नको त्या वाईट प्रवृत्ती बोकाळत आहे. यासाठी संतुलित, शाश्वत, जबाबदार लोकसहभागातून होणाऱ्या वनव्यवस्थापनातूनच शाश्वत उपजीविका निर्माण होईल व सर्वांनाच मशुद्ध हवा आणि शुद्ध आरोग्य अनुभवता येईल.

# तुमच्यात रक्ताचे नाते! विरोध करा पण भाषा जपून वापरा

## भुजबळांचा श्रीनिवास पवारांना इशारा

**मुंबई :** राज्यात पाच टप्प्यांत निवडणुका आहेत त्यामुळे जागावाटप हळू-हळू होत आहे. नाशिकची निवडणूक २० मे रोजी आहे, त्यामुळे वेळ आहे. पहिली निवडणूक विदर्भात आहे बाकी नंतर आहेत. विधानसभा आणि मनपाच्या पण निवडणुका होणार आहेत. राज ठाकरे आल्यामुळे महायुतीची शक्ती वाढेल कमी होणार नाही, असे मत मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले.

कोणाची ताकत किती आहे हे मला माहिती नाही. कोणालातरी बरोबर घ्यायचे आहे तर जागा द्याव्या लागतील. मोदींना परत पंतप्रधान म्हणून पुन्हा बसवायचे आहे. त्यामुळे वरून आदेश आले तर सगळे शांत होतील. १० वर्षात हेमंत गोडसे यांनी काहीच केले नाही असे भाजप





पदाधिकारी म्हणत असतील तर त्यावर नेते बघतील, असे भुजबळ म्हणाले.

श्रीनिवास पवार यांच्यावर भाष्य करणे योग्य होणार नाही. अजित पवार यांच्या विरोधात त्यांचे कुटूंब आहे अस दिसत आहे. विरोध करा पण भाषा जपून वापरा. राजकारणात विरोधात असले तरी तुमच्यात रक्ताचे नात आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यात देखील वाद झाले. मात्र त्यांच्यात काही अडचण आल्या तर ते एकमेकांना साठी धावून जातात, असा इशारावजा सल्ला भुजबळ यांनी अजित पवारांच्या बंधुंना दिला आहे.

तसेच श्रीनिवास पवारांच्या अजित पवारांवरील टीकेला प्रत्युत्तर देताना जोपर्यंत शिवसेने बरोबर होते तोपर्यंत कोणी काही बोलले नाही. शिवसेनेचा हिंदुत्व चालते मग भाजपचे का नाही? असा सवाल केला. तसेच आम्ही फक्त युती केली आमचा पक्ष वेगळा आहे, असेही भुजबळ म्हणाले.

# राजापुरी हळदीला सोन्याचा भाव, क्विंटलला ६१ हजार



**सांगली :** सांगली कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळदीला हंगामात सोन्याचा भाव मिळताना दिसत आहे. बुधवारी निघालेल्या हळदीच्या सौद्यात राजापुरी हळदीस ऐतिहासिक ६१ हजार रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला आहे. बाजार समिती स्थापन झाल्यापासूनचा हा ऐतिहासिक दर राहिला आहे. आवक कमी असल्यामुळे हळदीला सरासरी १८ ते २५ हजारांपर्यंत दर मिळाला आहे. दर तेजीत असल्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.सांगली मार्केट यार्डात बुधवारी एन. बी. पाटील-शिरगावकर यांच्या अडत दुकानामध्ये अरिहंत बाबू गुळण्णावर (रा. यरगट्टी) व बसाप्पा पराप्पा कोकटनुर (रा. यरगट्टी) या शेतकऱ्यांनी हळदी विक्रीसाठी आणली होती. या हळदीस सौद्यामध्ये उच्चांकी ६१ हजार रुपयांचा दर देऊन मनाली ट्रेडिंग कंपनी यांनी खरेदी केली. सध्या हळद या शेतीमालास उच्चांकी भाव मिळत असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. सांगली कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती सुजय शिंदे, सभापती, सचिव महेश चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये सौदे निघाले. यावेळी मनोहर सारडा, कौशल शहा, संदीप मालू, विवेक शहा, बाळू मर्दा, भरत अटल, अविनाश अटल, राजेश पटेल आदी व्यापारी उपस्थित होते

**बारा वर्षांनंतर दर वाढले :**

२०१०-११ यावर्षी हळदीला प्रतिक्विंटल ३२ हजार रुपयांचा उच्चांकी दर मिळाला होता. यावेळी सरासरी दरही १५ ते २० हजार रुपये क्विंटल दर होता पण, त्यानंतर हळदीचे दर खूपच कमी झाले. गेल्यावर्षी तर प्रति क्विंटल सहा ते नऊ हजार रुपये दर होता. यामुळे हळद लागण कमी झाली. म्हणूनच सद्या हळदीचे दर वाढले आहेत. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येन हळद विक्रीसाठी सांगली मार्केट यार्डात आणावी, असे आवाहन एन. बी. पाटील-शिरगावकर आडत दुकानदार नितीन पाटील यांनी केले.

### निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर

# राज्य सरकारने मुंबई आणि नवी मुंबई महापालिकेत नव्या आयुक्तांची नियुक्ती



**मुंबई :** निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर राज्य सरकारने मुंबई आणि नवी मुंबई महापालिकेत नव्या आयुक्तांची नियुक्ती केली आहे. या दोन्ही पालिकेत बुधवारी नूतन आयुक्तांनी पदभार स्वीकारला. मुंबई महापालिकेचे आयुक्त म्हणून डॉ.भूषण गगराणी यांनी पदभार स्वीकारला. नवी मुंबई आयुक्तपदी डॉ. कैलास शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली असून ते गुरुवारी पदभार स्वीकारतील . डॉ. शिंदे हे तत्पूर्वी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पाहत होते. मुंबई महापालिकेत दोन नव्या अतिरिक्त आयुक्तांचीही नियुक्ती झाली असून या दोघांनीही बुधवारी पदभार स्वीकारला. तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच पदावर असणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांची बदली करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले होते. आयोगाच्या आदेशानुसार नव्या नियुक्त्या झाल्या आहेत

मुंबई महापालिका आयुक्तपदासाठी राज्य सरकारने मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत असलेले भूषण गगराणी, बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर आणि एमएमआरडीए आयुक्त संजय मुखर्जी या तिघांची नावे आयोगाला पाठवली होती. त्यानंतर गगराणी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. मुंबई महापालिकेतील अश्विनी भिडे आणि पी.वेलरासू या दोन अतिरिक्त आयुक्तांच्या पदावर अनुक्रमे डॉ. अमित सैनी व अभिजित बांगर यांची नियुक्ती करण्यात अली आहे. डॉ.गगराणी यांनी मावळते आयुक्त इकबाल सिंह चहल यांच्याकडून पदभार स्वीकारला.यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे, सह आयुक्त (सामान्य प्रशासन) मिलिन सावंत, सह आयुक्त (विशेष) रमेश पवार, सह आयुक्त (महानगरपालिका

# काँग्रेसमध्ये आता केवळ ३ जण प्रबळ दावेदार

**राजदंड न्यूज नेटवर्क**

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाली असताना काँग्रेसचा उमेदवार अद्यापही जाहीर झालेला नाही. त्याउलट भाजपने मराठा उमेदवार देऊन प्रचारात आघाडी घेतली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेसमध्ये २० जण इच्छुकांच्या मुलाखती घेऊन आता केवळ ३ जण प्रबळ दावेदार आहेत. त्यामध्ये माजी आमदार मोहन जोशी, आमदार रवींद्र धंगेकर आणि काँग्रेसचे माजी गटनेते आबा बागुल यांचा समावेश आहे.

काँग्रेसमधील ज्येष्ठ नेते मंडळी आता कामाला लागली आहे. त्यामुळे २० जणांची इच्छुकांची यादी आता कमी करून शहर पातळीवर तीन नावे निश्चित केली आहेत. या तीन उमेदवारांपैकी कोणालाही उमेदवारी द्या, अशी भूमिका शहरातील पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. त्यामुळे इतर मागासवर्गाला (ओबीसी) संधी मिळणार की अनुभवी उमेदवाराला, याबाबतचा तिढा सोडविण्यासाठी आता प्रदेश पातळीवर निर्णय सोपविण्यात आला आहे.

भाजपाने मराठा उमेदवार दिला असल्याने काँग्रेसकडून ओबीसी उमेदवार देण्याबाबत चाचणी सुरू आहे. तीन नावांपैकी धंगेकर आणि बागुल हे दोघेही ओबीसी प्रवर्गातील आहेत.

धंगेकर हे कसबा विधानसभा पोटनिवडणूकीमुळे पुणेकरांच्या चांगल्याच परिचयाचे झाले आहेत. त्यांचा कसब्यातील करिष्मा शहरात लागू होण्याची शक्यता गृहीत धरून काँग्रेसकडून त्यांच्या नावाला पसंती देण्यात येत आहे. मात्र, त्यांच्यापेक्षा माजी आमदार मोहन जोशी यांचा निवडणुकांचा अनुभव दांडगा आहे. यापूर्वी त्यांनी दोन वेळा लोकसभा निवडणूक लढवली आहे. १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत जोशी यांना दोन लाख १३ हजार मते मिळाली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत जोशी यांना तीन लाख मतदारांनी मते दिली होती. त्यामुळे अनुभवाला संधी मिळणार की लोकप्रियतेला, याबाबतचा निर्णय आता काँग्रेसच्या प्रदेश पातळीवर घेतला जाणार आहे.

बागुल यांनी पुणे महापालिकेतर्फे विविध प्रकल्प त्यांच्या प्रभागात सुरू केले आहेत. अभ्यासू नगरसेवक म्हणून त्यांची ओळख आहे. महापालिकेत गटनेते असताना त्यांनी भाजपच्या कारभारावर वचक ठेवण्याचे काम त्यांनी केले. त्यामुळे त्यांचाही उमेदवारीसाठी विचार करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# एसटीवरच्या राजकीय जाहिरातींवर टाच, आगार व्यवस्थापकांना सूचना

**मुंबई :** आचारसंहिता भंग होऊ नये यासाठी राजकीय जाहिराती काढून टाकण्याचे सत्र सुरू असतानाच एसटी महामंडळानेही एसटी बस, स्थानक आणि आगार परिसरातील जाहिराती हटविण्यास सुरुवात केली आहे.

बस स्थानकात, आगारात तसेच एसटी बसवर विविध आस्थापनांच्या जाहिराती प्रसिद्ध होत असतात. त्या काढाव्यात असे आदेश आहेत. खासगी एजन्सीकडून राजकीय जाहिराती हटविल्या जात असल्या तरी सर्व बस आगारांमध्ये उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे ही कारवाई तत्काळ करावी. एसटी बस कोणत्याही स्थितीत आगारात दाखल झाल्यास कर्मचाऱ्यांकडून राजकीय जाहिराती काढल्या जाव्यात.



एसटी बस इतर आगाराची किंवा इतर विभागाची आहे म्हणून जाहिराती काढण्यास टाळाटाळ करू नये आणि आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता आपआपल्या स्तरावर घ्यावी, अशा सूचना आगार व्यवस्थापकांना देण्यात आल्या आहेत.

# राज्यात एक महिना पुरेल इतकाच क्षयरोग औषधांचा साठा

**मुंबई :** मागील काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्रासह देशामध्ये क्षयरोगावरील औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता. ही बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने तातडीने क्षयरोगावरील औषधे खरेदीची प्रक्रिया सुरु केली. मात्र आजही फोर-एफडीसी आणि श्री-एफडीसी या प्रकारातील औषधांचा साठा एक महिनाच पुरेल इतकाच उपलब्ध आहे. ही औषधे मार्च किंवा एप्रिल अखेरपर्यंत पुरेल इतकाच साठा असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध झाला नाही, तर केंद्र सरकारच्या क्षयरोगमुक्त भारतच्या योजनेला खीळ बसण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने देशातील सर्व राज्यांना स्थानिक पातळीवर औषधे खरेदी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. असे असले तरी ही औषधे स्थानिक पातळीवर उपलब्ध होत नसल्याने राज्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, ओरिसा, बिहार, छत्तीसगड या राज्यांसह संपूर्ण देशामध्ये काही महिन्यांपूर्वी क्षयरोगाच्या औषधांचा तुटवडा निर्माण झाला होता. यासंदर्भात देशातील क्षयरोगविरोधी काम करणाऱ्या संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवला होता. त्याची दखल घेत केंद्र सरकारने क्षयरोग मुक्त भारतच हे अभियान अधिक सक्षमपणे राबविता यावे, यासाठी तातडीने क्षयरोगविरोधी औषधांची खरेदी करण्यास सुरुवात केली. यासाठी राष्ट्रीय स्तरावर क्षयरोगविरोधी औषधांची खरेदी प्रक्रिया सुरू केली. ही प्रक्रिया पूर्ण करून पुरवठादारांना खरेदी आदेशही जारी करण्यात आले. त्यानुसार पुरवठादारांकडून क्षयरोगाच्या काही औषधांचा पुरवठाही सुरू झाला. मात्र फोर-एफडीसी आणि श्री-एफडीसी या प्रकारातील औषधे राष्ट्रीय स्तरावर उपलब्ध नाहीत. तांत्रिक अडचणींमुळे या औषधांच्या पुरवठ्यास विलंब होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेत केंद्र सरकारने ही औषधे स्थानिक पातळीवर खरेदी करण्याच्या सूचना राज्य सरकारांना दिल्या आहेत.

# नारायणगाव महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**नारायणगाव :** नारायणगाव ता. जुन्नर येथील ग्रामोन्नती मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाणिज्य विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन केंद्राच्या वतीने आंतरराष्ट्रीय आंतरशाखीय परिषद आयोजित करण्यात आली होती.

या आंतरराष्ट्रीय परिषद सस्टेनेबल प्रॅक्टिसेस अँड ट्रेंड्स इन कॉमर्स, मॅनेजमेंट,सायन्सेस, एग्रीकल्चर, एज्युकेशन,लॉ इंजीनियरिंग, हेल्थ आणि फार्मसी या आंतरशाखीय विषयांवर घेण्यात आली. वाणिज्य विभाग आणि वाणिज्य व व्यवस्थापन संशोधन केंद्राचे आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित करण्याचे हे सातवे वर्ष आहे. सदर परिषदेस जगभरातून बँकॉक देशातील पुकेत व थायलंड, दुबई, शारजा, अबुधाबी, टोरंटो - कॅनडा, बांगलादेश त्याचबरोबर रायपूर, छत्तीसगड, कर्नाटक,गोवा, रांची, दिल्ली, पटना- बिहार,भागलपूर -बिहार येथून ७० प्राध्यापक, इंजिनीयर, वकील, डॉक्टर्स,संशोधक आणि १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. १३० संशोधन निबंध प्रकाशित करण्यात आले. परिषदेमध्ये ३० प्राध्यापकांनी आणि १४ विद्यार्थ्यांनी संशोधन निबंधांचे सादरीकरण केले,अशी माहिती संशोधन विभाग प्रमुख प्रा. डॉ.जे.पी.भोसले आणि प्राचार्य ए.बी. कुलकर्णी यांनी दिली.



आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन के.के मोदी विद्यापीठ, दुर्ग,छत्तीसगड येथील कुलगुरू डॉ मोनिका शेट्टी - शर्मा यांनी केले. प्रमुख पाहुणे पोणांखोन राजाभट युनिव्हर्सिटी,बँकॉक- थायलंड येथील डॉ.अरुण चैनीत,डॉ. फुखोंग चैवत,दुबई येथील सेहगल ग्रुप ऑफ इंडस्ट्रीचे चेअरमन डॉ. सुरेशकुमार मधुसूदनन, टोरंटो- कॅनडा येथील डॉ. मनोज जैन यांनी जागतिक बाजारपेठेतील विक्री व्यवस्थापन सेवा व्यवस्थापन,आंतरराष्ट्रीय कायदे आणि उत्पादन,विक्री व सेवा उद्योगासमोरील आव्हाने उपाय योजनांवर आपली मते मांडली. हिमालयीन युनिव्हर्सिटी अरुणाचल येथील उपकुलगुरू डॉ. प्रकाश दिवाकरण आणि निलया ग्रुप ऑफ एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, पुणे येथील सीए निलय मेहता यांनी शैक्षणिक संस्था पुढील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आव्हाने व उपाययोजनांवर भाष्य केले. गोवा विद्यापीठाच्या विद्या परिषदेचे सदस्य आणि गव्हर्मेंट कॉलेजचे प्राचार्य डॉ. फिलिप रॉड्रिंग्स, नेसवाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स पुणे येथील प्राचार्या डॉ. वैशाली रणधीर यांनी जागतिक वाणिज्य व व्यवस्थापन आणि उच्च शिक्षणाची कामगिरी विशद केली. ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड इंटरनॅशनल एग्रीकल्चर या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचा शेती व शेती व्यवसायातील वापर आणि आंतरराष्ट्रीय शेती व्यवसायासमोरील आव्हाने व उपाय योजना यावर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.मुंबई येथील आंतरराष्ट्रीय क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट रंजिता पवार- जव्हेरी यांनी ताण-तणावव्यवस्थापन, आरोग्य, कौटुंबिक स्वास्थ्य आणि मनुष्याच्या मनाचे नियंत्रण व व्यवस्थापनावर प्रकाश टाकला. कावेरी कॉलेज पुणे येथील मनुष्यबळ व्यवस्थापन विभागाच्या प्रमुख आणि प्रसिद्ध मनुष्यबळ व्यवस्थापन तज्ञ प्रा. डॉ. श्वेता बापट यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उद्योग व्यवसाय,शैक्षणिक संस्था आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात मनुष्यबळ व्यवस्थापनाचे महत्त्व सांगितले. गुवाहाटी कॉमर्स कॉलेज,गुवाहाटी येथील प्रा. डॉ. गौर गोपाल बनिक यांनी जागतिक देश आणि विकसित भारत या विषयावर विवेचन केले.

मुंबई येथील मोटिवेशनल स्पीकर आणि ॲक्टर डॉ. फिरदोस श्रॉफ, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी नवी मुंबई येथील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेच्या डीन डॉ. हर्षा गोयल यांनी मोटिवेशन आणि करिअर,नेतृत्व कौशल्य यावर आपले मत मांडले.

सिनर्जी लाइफस्टाईल प्रायव्हेट लिमिटेड मुंबई येथील चीफ फिनान्शियल ऑफिसर सीए डॉ. मोतीलाल भावनानी यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योगांचे वित्तव्यवस्थापन याबरोबरच कौटुंबिक आर्थिक व्यवस्थापनावर भाष्य केले.

सी.एस कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कूनकोलीम गोवा येथील प्राचार्य डॉ. ए. व्ही. रायकर यांनी उद्योग व्यवसाय आणि संज्ञापन कौशल्य आणि शैक्षणिक संस्थांचे व्यवस्थापन यावर संबोधन केले.

सदर आंतरराष्ट्रीय परिषद यशस्वी करण्यासाठी ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे, कार्याध्यक्ष अनिल मेहेर,उपाध्यक्ष सुजित खैरे,उपकार्याध्यक्ष डॉ. आनंद कुलकर्णी,कार्यवाह रवींद्र पारगावकर, ग्रामोन्नती मंडळाचे संचालक अरविंद मेहेर व प्राचार्य डॉ. ए.बी.कुलकर्णी यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन संशोधन केंद्राचे प्रमुख प्राध्यापक डॉ. जे पी भोसले, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एस. डी. टाकळकर यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अनुराधा घुमटकर, डॉ. विनोद पाटे, डॉ. आबा जगदाळे,डॉ.मधुरा काळभोर, डॉ. वैशाली मोढवे, डॉ. सारिका जगदाळे प्रा. पूनम आवटे, प्रा. सविता खरात, प्रा. तनुजा वाघ,प्रा. निलेश गावडे,प्रा. वैभव शिंदे प्रा.पूजा वाव्हळ, प्रा. गजानन जगताप, प्रा. डॉ.एस.एम फुलसुंदर, प्रा.आकाश कांबळे प्रा. जी.बी होले, प्रा. अक्षय भोर, प्रा.अक्षय वाजगे, प्रा.राजेंद्र महानवर,प्रा.समीर शेख, प्रा. सुप्रिया निंबाळकर, प्रा.अंकुश पिंगळे, प्रा. वैशाली वाघ यांनी विशेष परिश्रम घेतले.